
Prof. Shriniwas Hemade,madshri@hotmail.com, 9226563052, Sangamner College, Sangamner 422605

# Unit 4

# Logic And Methodology

घटक 4

# तर्कमीमांसा आणि पद्धतीशास्त्र




अभ्यासक्रम

**अ) तत्त्वज्ञानाच्या पद्धती**
वाद पद्धती आणि संवाद पद्धती

**ब) युक्तिवादाचे स्वरुप**
अनुमानाचे आकार
- विगमन आणि निगमन

---

## प्रस्तावना

विचारांच्या नियमाचे विज्ञान : तर्कमीमांसा (Logic)

" **मा**णूस हा विचार करणारा प्राणी आहे."[1] अशी व्याख्या प्राचीन ग्रीक तत्ववेत्ता ॲरिस्टॉटल याने केल्याचे मानले जाते. "आपण सारेच विचार करतो" असे जरी म्हणत असलो तरी पण प्रत्येक जण विचार करेलच, याची खात्री देता येत नाही. पण सजीव प्राण्यांचा वर्ग घेतला तर माणूस ज्यात सुसंगत विचार करु शकतो, असे लक्षात येते.

'विचार करणे', हा जग समजावून घेण्याचाच एक अर्थ आहे. जग म्हणजे वस्तुस्थिती. ती आपण समजावून घेतो याचा अर्थ, तिचे केवळ निरीक्षण करतो; असे नाही, तर त्या वस्तुस्थितीविषयी विचार करुन काही निष्कर्ष काढतो.पण बेशिस्त विचार म्हणजे सुतर्क केलेला विचार नाही.विशिष्ट पध्दतीने शिस्त व विचाराचे नियम पाळून विचार मांडला तरच त्यातून काहीएक निश्चित विचार व कृती शक्य होते.त्यासाठी विचार कसा करावा,याचाही विचार करावा लागतो.असे विचाराच्या नियमांचे शास्त्र म्हणजे **तर्कमीमांसा** किंवा **तर्कशास्त्र** होय. भारतीय परिभाषेत तर्कशास्त्राला **'अनुमानशास्त्र'** म्हंटले जतो. ते मुख्यत: न्याय दर्शनाने मांडले. त्यांनी अनुमान हे ज्ञानाचे साधन मानले आहे, हे आपण पाहिलेच.

दैनंदिन जीवन जगतांना आपण सतत वेगवेगळे अंदाज व्यक्त करतो. हवामान, पाऊसपाणी,राजकीय - सामाजिक घडामोडी, कौटुंबिक हालचाली इत्यादींचा अंदाज केला जातो.चांगला पाऊस झाला तरच स्वस्ताई होईल हा अंदाज आहे. पण सर्व अंदाज, अनुमान खरे असतातच,असे नाही . अतिरिक्त पाऊस झाला तर नुकसान होऊ शकते. म्हणून अंदाज आणि तर्क यात फरक केला जाते. चांगला योग्य व अचूक तर्क कसा करावा, याचे शास्त्र म्हणजे तर्कशास्त्र. तर्क म्हणजे अचूक अंदाज. आपला सर्व व्यवहार तर्कावर अवलंबून असतो. बेकारीमुळे गुंडगिरी वाढते, सर्व अधांतरी

---

[1] ही व्याख्या ॲरिस्टॉटलने दिली नसावी. त्याच्या या ग्रंथात तो "zoon logikon" हे शब्द वापरतो. "Zoon" हा "zoo", शब्द पासून बनतो. पण "logikon" या शब्दाचा अर्थ 'विचारशील' असा होतो की नाही हे निश्चित नाही. कारण त्या संकल्पनेत 'आत्मा, मन याही घटकांचा समावेश होतो. अर्थात Nicomachean Ethics या ग्रंथात (1.13), ॲरिस्टॉटल म्हणतो की माणसाकडे अशी बौद्धिक शक्ति किंवा तत्त्वे आहेत की जिच्या साह्याने माणूस जीवनात सुसंगत प्रकल्प राबवितो. http://en.wikipedia.org/wiki/Rational_animal

वस्तू जमिनीवर पडतात, टंचाईमुळे भाववाढ होते ; हे सर्व तर्क असतात. बेकारी आणि गुंडगिरी यांच्यातील सामाजिक , राजकीय, आर्थिक संबंध तार्कीक पध्दतीने जाणून घेता येतात.

**'युक्तिवाद' (Argument)**

सुसंगत विचार कसा करावा, त्याची पुन्हा सुसंगत मांडणी कशी करावी,त्याचे नियम कोणते;त्याची माहिती देणारी तर्कशास्त्र ही तत्त्वज्ञानाची एक शाखा आहे.विचार मांडणे याचा अर्थ आपले म्हणणे सांगण्यासाठी योग्य प्रशिक्षण देणारी तार्किक मांडणी करणे. युक्तिवादाची विशिष्ट प्रकारची रचना करावी लागते. काही विधाने पुरावा म्हणून ज्यांचा आधारास घ्यावी लागतात तर कही विधाने निष्कर्ष म्हणून मिळतात. या दोघांच्या रचनेला **'युक्तिवाद' (Argument)** असे म्हणतात. या अर्थाने युक्तिवाद म्हणजे विधानांची रचना असते.



(1)आधारविधाने : ज्यांचा आधार घेतला जातो त्यांना आधारविधाने
(2)निष्कर्ष विधान : जो निष्कर्ष काढला जातो त्यास निष्कर्ष विधान


आधारविधान + निष्कर्ष विधान मिळून युक्तिवाद पूर्ण होतो. उदाहरणार्थ पुढील युक्तिवाद पाहा :

सर्व माणसे मर्त्य आहेत
सॉक्रेटीस माणूस आहे. } आधार विधाने
म्हणून सॉक्रेटीस मर्त्य आहे. ⟶ निष्कर्ष विधान

सर्व उष्णकटीबंधातील लोक कृष्णवर्णी असतात.
सिलोन उष्णकटीबंधातील देश आहे. } आधार विधाने
म्हणून सर्व सिलोनी कृष्णवर्णी आहेत. ⟶ निष्कर्ष विधान

विचार योग्य तर्कावर आधारलेला असणे आणि योग्य म्हणजे युक्त असणे. युक्तता म्हणजे आधार विधानांमधून निष्कर्ष विधान निष्पन्न होणे होय. अशी परिस्थिती असेल तर त्या युक्तिवादास **युक्त युक्तिवाद** म्अथवा **सुतर्कित युक्तिवाद** अथवा **अनुमान** म्हणतात. (अनु = पाठीमागे, मागून, अनुसरुन आणि मान = जाणे. कशाच्या तरी मागून जाणे. म्हणजेच दिलेल्या विचाराच्या मागून जाणे.) वरील उदाहरणांमध्ये आधार विधानांमधून निष्कर्ष विधान निष्पन्न होते, त्यामुळे हे युक्तिवाद सुतर्कित आहेत. युक्त व सत्य विचार म्हणजे तर्क. त्याचे शास्त्र ते तर्कशास्त्र होय.

अशा युक्ततेचे/सुतर्किततेचे नियम निश्चित करण्याचा प्रयत्न पाश्चात्य तत्त्वज्ञानात प्रथम ॲरिस्टॉटलने (इ.स.पू.384 ते 322) या ग्रीक तत्वचिंतकाने केला. ॲरिस्टॉटल हा ग्रीक-पाश्चात्य तर्कशास्त्राचा आद्यगुरु मानला जातो. गेली शेकडो वर्षे सर्व जगात त्याचे तर्कशास्त्र शिकले-शिकविले जाते. अध्ययन व अध्यापनाची ती परंपरा बनल्याने त्याच्या तर्कशास्त्रास 'पारंपरिक तर्कशास्त्र' (Traditional Logic) म्हणतात.




नंतर मध्ययुगात लॉर्ड फ्रान्सिस बेकनने (इ.स.1561-1626) नवे तर्कशास्त्र मांडले. भारतातही तर्कमीमांसेची प्राचीन परंपरा आहे. न्याय, बौध्द व जैन तर्कपंडितांनी भारतीय तर्कशास्त्राचा विकास केला. अशा रितीने तत्त्वज्ञानाची शाखा म्हणून तर्कशास्त्राचा विकास पाश्चात्य व भारतीय तत्त्वज्ञानात झाला.

तर्कशास्त्रास इंग्लीशमध्ये Logic असा शब्द आहे.त्याचे मूळ *legein* या शब्दात असून त्यापासून ग्रीक भाषेत *logos* हा शब्द बनतो.*legein* म्हणजे सांगणे, म्हणणे.त्यामुळे ॲरिस्टॉटल *logos* ला ' विचार करणारे द्रव्य '

Prof. Shriniwas Hemade, madshri@hotmail.com, 9226563052

किंवा तर्कशक्ति *reason* म्हणतो.म्हणून Logic चा अर्थ योग्य विचार करण्यास शिकविणारे शास्त्र. Logic हा प्रत्यय लागूनच biology, zoology, anthropology, sociology, psychology, astrology, philology इत्यादी विषयांची नावे तयार होतात.या प्रत्येक विषयाला स्वत:चे तर्कशास्त्र विकसित करावे लागतेच.नुकत्याच विकसित झालेल्या संगणकशास्त्राला सुध्दा ते तयार करावे लागले.प्रत्येक ज्ञानशाखा आपले काम Logic विकसित करुनच त्यानुसारच करते.हे Logic चुकले की काम ठप्प होते ! (गेल्या काही वर्षात काही मोटरसायकलींवर Logic असे लिहीलेले आढळेल . कारण त्या कंपनीने ते विकसित करून त्या गाडीत ते उपयोगात आणलेले असते.)

तर्कमीमांसेचे नियम उपयोगात आणूनच वैज्ञानिक पद्धती विकसित होते. विशेषत: विगमानात्मक निष्कर्षावर विज्ञान रचले जाते. म्हणून तर्कमीमांसेत तत्त्वज्ञानाच्या पद्धती विकसित झाल्या आहेत आणि त्यामधूनच पद्धतीशास्त्रही निर्माण झाले आहे. आपण या दोन्हीचा परिचय करुन घेवू :

### 1) तत्त्वज्ञानाच्या पद्धती (METHODS OF PHILOSOPHY)

आपण हे पाहिले की माणूस हा विचार करणारा प्राणी आहे. प्रत्येक माणूस कसला ना कसला विचार करतोच.पण प्रत्येक मानवी व्यक्ति योग्य रितीने विचार करेलच, असे नाही.सामान्य माणूस मुख्यत: आपल्या भावना, इच्छा, वासना यांच्या आहारी जावून विचार करतो.परिणामी अविचारीच कृतीच घडताना दिसते. सामान्य माणूस वस्तुनिष्ठ विचार करीलच असे नसते.म्हणुनच हेतूपूर्वक सुसंगत विचार करण्याची सुव्यवस्थित पध्दती विकसित करावी लागते. ती विकसित करण्याचे काम सुध्दा अर्थातच माणूसच करतो.त्यांना विचारी माणसे किंवा विचारवंत म्हणता येईल.

अशी विचारवंत माणसे म्हणजे मुख्यत: शास्त्रज्ञ आणि तत्त्ववेत्ते असतात. शास्त्रज्ञ शास्त्रीय पध्दतीने विचार करतो. प्रत्यक्ष निरीक्षण,अनुभव,प्रयोग,पडताळा,निष्कर्ष मार्गाने शास्त्रीय पध्दतीचे स्वरुप निनिश्चत होते.जगात सर्वत्र हीच पध्दती शास्त्रज्ञ उपयोगात आणतात.तत्त्ववेत्ता मात्र तात्त्विक पध्दतीने विचार करतो. अशी तात्त्विक पध्दती म्हणजेच तात्त्विक विचार करण्याची पध्दती होय. या पध्दतीचा उपयोग करुनच तत्त्वज्ञान निर्माण करता येते. म्हणून तत्त्वज्ञानाची पध्दती याचा अर्थ तत्त्वज्ञान निर्मितीची पध्दती असते. प्रत्येक तत्त्ववेत्ता आणि तत्त्वज्ञानातील संप्रदाय आपापल्या तात्त्विक धारणेनुसार (म्हणजेच तत्त्वज्ञानानुसार ) आपली विचार करण्याची पध्दती निश्चित करतो.

तत्त्ववेत्त्याची विचार पध्दती एकतर त्याने स्वत:च निर्माण केलेली असते किंवा ज्या संप्रदायाचे प्रतिनिधीत्व करीत तो असतो त्या संप्रदायाने ती दिलेली असते.उदाहरणार्थ सॉक्रेटीसची पध्दती,प्लेटोची पध्दती, देकार्तची पध्दती या नावाने ओळखल्या जाणाऱ्या तत्त्वज्ञानाच्या पध्दती ह्या व्यक्तिगत पध्दती आहेत. त्यामुळे त्या त्यांच्या नावाने ओळखल्या जातात. तर अनुभववादाची पध्दती,बुध्दिवादाची पध्दती इत्यादी पध्दती सांप्रदायिक पध्दती आहेत.

तत्त्वज्ञानाच्या या पध्दती प्रत्येकाला किंवा अन्य विचारसरणीच्या अनुयायांना मान्य झाल्याच पाहिजेत,असे नाही.मान्यता - अमान्यतेचा मुद्दा समन्वयातून सोडवावयाचा असतो.उलट मान्य नसेल तर तो मुद्दा खोडून काढणे, नवे विचार मांडणे ही प्रक्रिया घडते. त्यातून एकमेकांच्या पध्दतीची देवाणघेवाण करता येत असते. अशा अनेक पध्दतीं आहेत.या पैकी केवळ दोन पद्धतीचा अभ्यास आपण करणार आहोत.त्या पुढील प्रमाणे:

अ) वाद पध्दती (वाद,जल्प,वितण्ड )
ब) संवाद पध्दती ( सॉक्रेटीस )

### अ) वाद पध्दती : (वाद,जल्प आणि वितण्ड )

भारतीय तत्त्वज्ञानातील न्याय दर्शन या नावाने परिचित असणाऱ्या तत्त्वज्ञानाच्या संप्रदायाने ही वादपध्दती विकसित केली. ही चर्चा करण्याची पध्दती आहे. नेहमीच्या बोलण्यात,दैनंदिन वादविवादात, वादविवाद स्पर्धेत आणि आजच्या न्यायालयात ही पध्दती उपयोगी आहे.

Prof. Shriniwas Hemade, madshri@hotmail.com, 9226563052



**आदि शंकराचार्य चर्चा करताना** (कल्पनाचित्र)



वादपध्दती,ज्ञानाची साधने आणि तर्काचे नियम हे न्यायदर्शनाचे अभ्यासाचे विषय आहेत.यथार्थ ज्ञान व अथार्थ ज्ञान यांची चर्चा न्याय दर्शन करते.कोणत्याही विषयाची योग्य चिकित्सा कशी करता येते,याचे प्रशिक्षण या पध्दतीतून मिळते.निर्दोष विचार,चर्चा आणि अनुमान यांना आवश्यक असलेले नियम म्हणजे न्याय होत, असे न्याय दर्शन सांगते,[2] हा वाद जिथे ज्या ठिकाणी चालतो ते न्यायालय.तो कसा चालावा याचे प्रशिक्षण ज्या सभेत होते तिला '*तद्‌विद्य संभाषा परिषद*' म्हणतात. तद्‌विद्य म्हणजे तज्ञ आणि संभाषा म्हणजे चर्चा,परिषद म्हणजे सभा [3]**.** या सभेची रचना पुढीलप्रमाणे:

1. ***वादी :*** चर्चेचा मुद्दा उपस्थित करणारा. ( फिर्यादी)
2. ***प्रतिवादी :*** चर्चेत विरोध करुन आपले मुद्दे मांडणारा. ( अशील )
3. ***सभापति :*** वादाचा आरंभ करणे,त्यावर लक्ष ठेवणे आणि शेवटी निर्णय देणे, ही कामे करणारा विद्‌वान अधिकारी व्यक्ति.यालाच *'मध्यस्त'* असेही म्हणतात. (जज् / न्यायाधीश.)
4. ***प्राश्निक :*** अधूनमधून सूचक प्रश्न करणारे (प्रेक्षक / साक्षीदार )

अशी रचना झाल्यानंतर जी चर्चा केली जाते तिलाच *वादविवाद* म्हणतात. पण वाद कसाही घालावयाचा नसतो, तर वादपध्दतीचे विशिष्त स्वरुप लक्षात घेवून वाद घालावयाचा असतो.अलिकडील काळात संसद, विधीमंडळ, विविध प्रकारचे परिसंवाद,परिषदे,वादस्पर्धा आणि विविध वृत्तवाहिन्यांवर अशी चर्चा घडताना आपण पाहातो.या वादाचे स्वरुप पुढीलप्रमाणे :

## अ) वाद :

वाद म्हणजे एखाद्‌या विषयातील तत्त्व कळावे किंवा तो विषय कळावा,या हेतूने सुरु केलेली चर्चा. या चर्चेत कोणतेही खोटे पुरावे सादर करवयाचे नसतात.समजा चुकून केले गेले तर ते मागे घेवून चर्चा पुढे न्यावयाची असते.ही चर्चा वादी आणि प्रतिवादी यांच्यात होते.या दोघात कुणीतरी विजयी होवू शकतो.पण वाद बरोबरीत सुटला तर अंमित निर्णय देण्याचा अधिकार सभापतिचा असतो.त्या निर्णयानंतर पुन्हा कुणी वाद घालावयाचा नसतो.वाद घालावयाचाच असेल तर ज्या मुद्द्यावर विजय मिळविलेला असतो,त्याच्या पुढील मुद्द्यावर वाद घालावयाचा असतो.उदाहरणार्थ ,

**चर्चा विषय :** आत्म्याचे अस्तित्व
**वादी :** आत्मा आहे. कारण तो नित्य आहे.
**प्रतिवादी :** आत्मा अस्तित्वात नाही. कारण त्याचे अस्तित्व जाणवत नाही. त्याचे ज्ञान अनित्य आहे

## ब) जल्प :

वादाच्या या प्रकारात दुसऱ्याला हरविणे एवढाच हेतू असतो, त्याच वेळी स्वत: कोणताही पुरावा द्यावयाचा नाही, असे केले जाते.दुसरा कोठे चुक करतो त्यावर बारीक लक्ष ठेवून त्या चुकीचेच भांडवल करुन त्याचा पराभव झाला, अशी घोषणा केली जाते.आणि चर्चा बंद केली जाते.उदाहरणार्थ,

[2] म्हणून या दर्शनास ' न्यायशास्त्र' असे म्हंटले आहे. लक्ष्मणशास्त्री जोशी , "वैदिक संस्कृतीचा इतिहास" पान 184 आवृत्ती दुसरी 1972 प्राज्ञपाठशाळा, वाई

[3] सुरेंद्र बारलिंगे-क्रांतिप्रभा पांडे,"भारतीय तर्कशास्त्राची रूपरेखा ", तत्त्वज्ञान विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे

Prof. Shriniwas Hemade, madshri@hotmail.com, 9226563052

**अ :** जे जे अज (जे जन्मत नाही ) ते नित्य असते. जसा ईश्वर.
**ब :** जे नित्य असते ते अज असते, जसा ईश्वर .

किंवा

माणूस इथून तिथून सारखाच !
या बोलण्याला काही अर्थ नाही .
मग तुझ्या बोलण्यालाही काही अर्थ नाही.
तुझ्याही बोलण्याला काय अर्थ आहे ?



## क) वितण्डा:

वादाच्या या प्रकारात दुसऱ्याला हरविणे हा हेतू सुध्दा नसतो. तर केवळ शब्दाला शब्द वाढविणे, निष्फळ चर्चा वाढविणे,कोणताही निर्णय स्वत: न घेणे आणि दुसऱ्याला ही घेवू न देणे,एवढेच असते. अशी चर्चा टाळावयाची असते आणि दुसऱ्याला करु द्यावयाची नसते.पण दुदैवाने बहुधा सर्वत्र वितण्डवादच घातला जातो. उदाहरणार्थ,

आता साक्षरता प्रसाराची चळवळ केली पाहिजे.
कशासाठी ?
म्हणजे काय ? देशाच्या प्रगती !
छे ! अमेरिका, जर्मनी यांनी काय साक्षरता प्रसार केला होता काय ? त्यांनी प्रगती केलीच ना ?
बरं , मग सगळ्यांना मिलीटरी ट्रेनिंग सक्तीचे करु काय ?
काय मरायचयं काय ? उलट युध्द होईल, प्रगती तर लांबच.
ठिकाय, मग लोकांमध्ये ऐक्य निर्माण करु.
अरे बापरे ! हे सगळे अठरापगड जातीचे एकत्र येणार !! अशक्य.
बरंस, मग तुम्हीच काहीतरी सुचवा.
नाही मी काही अजून विचार केलेला नाही.

किंवा

ए, जास्त शानपना करु नको.
तू शानपना दाखवू नको.
तू कोण विचारणार ?
तू कोण लै शाना ?

## पूर्वपक्ष - उत्तरपक्ष पध्दती:

कोणत्याही वादात दोन बाजू असतात.पहिली बाजू : वादविषयाच्या समर्थनासाठी बोलणारी तर दुसरी - वादविषयाच्या विरुध्द बोलणारी. बोलणाऱ्या या दोन्ही बाजूंना '*पक्ष*'[4] म्हणतात. एकाला पूर्वपक्ष तर दुसऱ्याला उत्तरपक्ष म्हणतात.पूर्वपक्ष म्हणजे समोरचा आपल्या विरोधी विचार मांडणारा पक्ष आणि उत्तरपक्ष म्हणजे स्वत:चा विचार मांडणारा पक्ष.स्वत:चे मत म्हणजे *सिध्दान्त*.

स्वत:चे मत मांडण्याला *मंडन* म्हणतात.तर दुसऱ्याचे मत खोडणे म्हणजे *खंडन*.समोरच्याचे म्हणणे काय आहे ? ते समजावून घेवून मग त्याला काय म्हणावयाचे आहे, हे आधी आपणच मांडावयाचे.मग स्वत:चे म्हणणे

---

[4] पक्ष म्हणजे पंख. पक्षाला पंख असतात.त्या त्याच्या दोन बाजू असतात.म्हणून पक्ष = बाजू.पक्षकार = बाजू असणारा.येथे बाजू = भूमिका.न्यायालयाच्या भाषेत बाजू = तक्रार अथवा तक्रारील उत्तर देणे.

Prof. Shriniwas Hemade, madshri@hotmail.com, 9226563052

मांडावयाचे.(म्हणजेच उत्तरपक्ष नेहमी पूर्वपक्षाला काय म्हणावयाचे आहे ते आधी मांडतो,मग स्वत:चे मत मांडतो.) थोडक्यात ज्याचे खंडन करावयाचे तो *' पूर्वपक्ष '* व ज्याचे समर्थन करावयाचे तो *' उत्तरपक्ष '*.या प्रकारात दोघांचाही विकास होतो.कुणाचाही बाजू कमकुवत राहात नाही.

भारतीय दर्शनांचा विकास याच विशिष्ट पध्दतींनी झाला.ही जणू त्यांची methodology च होती. एकमेकांचे अस्तित्व टिकवित विरोधक दर्शनाचाही विकास होईल,याची काळजी घेत हा विकास झाला.त्यामुळे एकाचा अभ्यास म्हणजे इतरांचाही अभ्यास ! या पध्दतीला *' पूर्वपक्ष - उत्तरपक्ष पध्दती '* किंवा *' खंडन -मंडन पध्दती ' म्हणतात.*

## ब) संवाद पध्दती (सॉक्रेटीसची प्रश्नोत्तर पध्दती)



सॉक्रेटीस (इ.स.पू. 470 ते 399) हा प्राचीन तत्त्ववेत्ता ग्रीक तत्त्वज्ञानाचा मुगुटमणी आहे.अथेन्स शहराचा तो रहिवासी होता.त्याचे वडिल मूर्तिकार आणि आई सुईण होती.त्याच्या पत्नीचे नाव झांटिपी होते.दिसायला अत्यंत सामान्य आणि जवळपास अर्धपशू असणारा सॉक्रेटीस अत्यंत नीतिवान ,नि:स्वार्थी ,विनम्र व प्रसन्न व्यक्तिमत्वाचा होता. ''आपणास ईश्वरी संदेश येतात'', असा त्याचा दावा होता. तो तरुणांना विचार करण्यास शिकवित असे.

राज्यसंस्थेचे देव नाकारुन सॉक्रेटीस स्वत:चे देव मांडतो, असा आरोप त्याच्यावर 70 व्या वर्षी ठेवण्यात आला आणि त्याला हेमलॉक नावाचे विष पिण्याची शिक्षा देण्यात आली.त्याच्या शेवटच्या कालखंडात त्याला प्लेटो (इ.स.पू.431 ते 351) हा सर्वोत्तम शिष्य लाभला.

सॉक्रेटीसची पध्दती ही खरे तर प्लेटोची पध्दती आहे.प्लेटोने त्याचे सारे तत्त्वचिंतन नाट्यमय संवादरुपात लिहिले.त्यांनाच Dialogues म्हणतात.गुरुला श्रध्दांजली म्हणून त्याने आपल्या साऱ्या संवादात सॉक्रेटीसला मध्यवर्ती स्थान दिले. एखाद्या नाटकाप्रमाणे त्या संवादाची रचना आहे.त्यात सॉक्रेटीस हे मुख्य पात्र आहे. या संवादातूनच खरा सॉक्रेटीस समजतो.अथेन्समधील तरुणांशी तो संवाद साधून त्यांना तत्त्वचिंतनाचे धडे देतो.जणूकाही सहकारातून विचार करण्याचे प्रशिक्षणच तो देतो.त्याची पध्दत अशी :

प्रथम सॉक्रेटीस स्वत:कडे कमीपणा घेतो,नम्रता धारण करतो.स्वत: ज्ञानी असूनहि अज्ञान असल्याची बतावणी करतो.आपण स्वत: इतरांकडून शिकू इच्छितो, असे दाखवितो.मग एखादा विषय घेवून एखाद्याला मत विचारतो किंवा त्या विषयाच्या दिशेने चर्चा सुरु करतो. नंतर तो संबंधित व्यक्तीला प्रश्न विचारुन व्याख्या करावयास सांगतो, त्या व्यक्तीने मत व्यक्त केले की मग सॉक्रेटीस त्या शब्दाचा अर्थ स्पष्ट करण्याची विनंती करतो.उदाहरणार्थ चर्चा 'धैर्य' या विषयावर असेल तर सॉक्रेटीस ''धैर्य म्हणजे नेमके काय'' असा प्रश्न उपस्थित करून चर्चा सुरू करीत असे.संबंधित व्यक्तीने ''अमुक अमुक करणे हे धैर्य होय'' असे म्हणून काहीएक वर्णन केले किंवा व्याख्या केली की सॉक्रेटीस मोठे समाधान दाखवितो.पण आपल्या काही शंका असून त्यांचे समाधान करण्याची विनंती करीतो.या शंका बोलून दाखवितो. त्यावेळी तो प्रश्न विचारतो. ते करताना मधेमधे न बोलता तो स्वत: गप्प बसणे पसंत करून संबंधितालाच बोलण्याची अधिक संधी देतो.पण त्याचवेळी चर्चेवर स्वत:चे नियंत्रण राहील, असे पाहतो. असे करीत करीत त्या वर्णनातील अथवा व्याख्येतील दोष शोधून देतो.ही चर्चा मग योग्य व्याख्या सापडेपर्यंत चालू राहते ![5] या पध्दतीचे एक ठळक उदाहरण घेवू :

***'जॉर्जिअस'*** हा एक संवाद आहे. हा संवाद जॉर्जिअस आणि सॉक्रेटीस यांच्यात झाला. या मुख्य संवादाच्या एका विभागात पुढील प्रश्नोत्तरे झाली.

सॉक्रेटीस: *मित्रा,ज्याला इमारती बांधण्याचे ज्ञान आहे त्याला आपण वास्तुविशारद (बिल्डर) म्हणू शकतो ना ?*
जॉर्जिअस : *होय.*
सॉक्रेटीस : *मित्रा,अगदी त्याप्रमाणेच ज्याला संगीत रचण्याचे ज्ञान आहे त्याला संगीतकार म्हणू शकतो ना ?*
जॉर्जिअस : *होय*
सॉक्रेटीस : *मग तर मित्रा,ज्याला औषधांचे ज्ञान आहे त्याला डॉक्टर म्हणू शकतो ना ?*

---

[5] अनेकदा व्याख्या होईलच असे नाही. ती न करताही चर्चा थांबे किंवा चर्चेच्या ओघात व्याख्या सापडतही नसे.

Prof. Shriniwas Hemade, madshri@hotmail.com, 9226563052

जॉर्जिअस *: होय*

सॉक्रेटीस *: मग अगदी तसेच इतर सर्वच कारगिर, तज्ञ यांच्याबाबतीत म्हणता येईल ना ?*

जॉर्जिअस : *होय*

सॉक्रेटीस : *मग याचा अर्थ असा झाला की जो जे जाणतो, ज्याला त्याच्या विषयाचे ज्ञान आहे आणि तो तो त्या त्या विषयात तज्ञ आहे , असे म्हणता येईल ना ?*

जॉर्जिअस *: होय, बरोबर आहे.*

सॉक्रेटीस *: तर मग मित्रा, नीतिमत्तेच्या बाबतीत तसेच नाही का होत ? ज्याला नीती- अनीतीचे ज्ञान आहे तो नीतीनेच वागेल, असे नाही का होत ?*



जॉर्जिअस : *होय तर ! निश्चितपणे.*

सॉक्रेटीस : *म्हणजे मित्रा, नीतीने वागणे म्हणजे नीतीचे ज्ञान असणे आणि नीतीचे ज्ञान असणे म्हणजेच नीतीने वागणे !*

जॉर्जिअस : *अगदी अचूक*

सॉक्रेटीस : *म्हणूनच नीती किंवा सद्‌गुण म्हणजेच ज्ञान !!*

जॉर्जिअस : *होय*

सॉक्रेटीसच्या या पध्दतीला *'प्रश्नोत्तर पध्दती'* किंवा *संवाद पध्दती'* [6] असेही नाव आहे. ही संवादाची , संभाषणाची अशी पध्दत आहे की जिच्यात नैतिक सद्‌गुणांबद्‌दलची सर्वसामान्य लोकांची मते तपासून निश्चित तात्त्विक संकल्पना तयार केली जाते. सॉक्रेटीस एखाद्‌याला प्रश्न विचारुन व्याख्या करावयास सांगतो, मग त्या व्याख्येतील दोष शोधून देतो. दुसरी व्याख्या करावयास सांगतो. मग तिसरी, चौथी, पाचवी. असे करीत तो हे दाखवितो की या साऱ्या व्याख्या किंवा वर्णने म्हणजे बोलणाऱ्या त्या संबंधित माणसाचे स्वत:चे केवळ 'मत *'(Opinion)* आहे. मतास सार्वत्रिकतेचा दर्जा नाही. म्हणून ते सगळ्यांना स्वीकारता येईलच असे नाही. कारण मत नेहमी व्यक्तिगत पातळीवरील अंदाज असतो. म्हणून मत म्हणजे ज्ञान *(Knowledge)* नव्हे .

## सॉक्रेटीसचा उपरोध / सॉक्रेटीसची पध्दती

सॉक्रेटीसची नैतिक प्रतिभा प्रामुख्याने चिकित्सक होती. त्याने धैर्य, संयम, न्याय, दूरदर्शीपणा या सारख्या नैतिक सद्‌गुणांविषयीचे तत्कालिन सुशिक्षित व सुखवस्तू लोकांचे अज्ञान त्याने उघडकीस आणले. आत्म्याच्या नि:श्रेयस सद्‌गुणांविषयीचे लोकांचे अज्ञान विनाशकारी आहे, हे सॉक्रेटीसने त्यांना पटवून दिले. पण हे नाजुक व धोकादायक काम असल्याने त्याने अतिशय हळूवारपणे आणि चलाखीने केले.

या प्रश्नोत्तर पध्दतीचा उपयोग करुन सॉक्रेटीस हे दाखवून देतो की लोक ज्याला नैतिक ज्ञान समजतात ते केवळ त्यांचे खासगी मत असते. कारण त्या मतात कोणतीही संकल्पना स्पष्ट केलेली नसते. नैतिक ज्ञान सद्‌गुणांचे असते.

ज्यास आपण सद्‌गुण समजतो अशा प्रकारच्या सर्व कृतीमध्ये नेमके कोणते घटक समान आहेत ' हे कळाले की सद्‌गुणाचे ज्ञान होते. आणि हे ज्ञान होणे कठिण असते. कारण लोक स्वत:चे मत सोडू इच्छित नसतात. म्हणजे जे खरोखरी अज्ञानी आहेत व ज्यांची शिकवणी घेतली पाहिजे, त्यांच्याकडूनच शिकण्याचा आविर्भाव सॉक्रेटीस आणीत असे. हळू हळू लोकांचे अज्ञान उघडकीस आणून त्यांना सत्यज्ञानाकडे तो घेवून जातो. हा उपरोध आहे, पण बोचरा नाही तर तात्त्विक आहे. म्हणून त्याच्या ह्या पध्दतीला **'सॉक्रेटीसचा उपरोध'** ***(Socratic Irony)*** म्हणतात.

---

[6] सॉक्रेटीसच्या पध्दतीला ' *द्वंद्‌वविकास पध्दती* ' म्हणतात. दोन परस्परविरोधी गोष्टींचा वाद होवून त्यातून दोघांना सामावून घेणारी तिसरी गोष्ट निर्माण होणे, याला द्वंद्‌वविकास म्हणतात. यात ही तिसरी गोष्ट पुन्हा अन्य दुसऱ्या वादासाठी पहिलीच्या जागी येते, तिला विरोध करणारी दुसरी येते ; त्यांचा समन्वय होवून पुन्हा तिसरी येते. असे अंतिम तत्त्व सापडेपर्यन्त घडत राहाते. ही पध्दती सॉक्रेटीसने झीनो (इ.स.पू.489 ते 430) या तत्त्वेत्त्याकडून उचलली. या पध्दतीला द्वंद्‌वविकास पध्दती / विरोधविकास पध्दती dialectic method हे नाव ॲरिस्टॉटलने (इ.स.पू.384 ते 322) दिले. ही पध्दती नंतर हेगेल (1770 ते 1831) आणि मार्क्स (1818 ते 1883)या तत्त्ववेत्त्यांनी स्वीकारली.

Prof. Shriniwas Hemade, madshri@hotmail.com, 9226563052

## पध्दती कुणासाठी ?



सॉक्रेटीसची प्रश्नोत्तर पध्दती ही मुख्यत: सर्वसामान्य, विशेषत: बाजारपेठेतील लोकांना शिकविण्याची पध्दती आहे.ही सत्य संशोधनाची पध्दती आहे. सर्वसामान्य ही माणसे विद्यापीठात अथवा शिक्षणसंस्थेत शिकलेली विद्वान मंडळी नसतात तर व्यावहारिक जगातील माणसे असतात.स्वत:च्याच मताला चिकटून असतात. त्यांच्या मतांवर हल्ला केला तर संवाद थांबू शकतो.त्यामुळे त्यांच्या कलाने घेवून हळहळू त्यांच्याकडूनच त्यांची चूक लक्षात आणून देवून सत्य शोधावे लागते.

हे काम सुईणीसारखेच असते.सुईण बाळ निर्माण करीत नाही; तर आईच्या पोटात असलेले बाळ जगात सुरक्षित प्रवेश करावे, यासाठी ती त्या आईला केवळ मदत करीत असते. म्हणून तर सॉक्रेटीस तत्त्ववेत्त्याला सुईण म्हणतो. सॉक्रेटीसच्या पध्दतीची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील :

## पध्दतीची काही वैशिष्ट्ये

***1) विधायक संशय आणि सत्य शोधनाची वृत्ती:*** सत्यशोधनासाठी आधी संशय घेणे नंतर तो सोडणे.

***2) संभाषणात्मक आणि चर्चात्मक :*** संभाषण,चर्चा करुन विविध मतंमधील एकमत शोधणे.

***3) व्याख्यात्मक आणि संकल्पनात्मक :*** नैतिक संकल्पनांची व्याख्या करुन संकल्पना निश्चित करणे.

***4) अनुभवाधारित आणि विगामी :*** ही पध्दत प्रत्यक्ष विशिष्ट अनुभव घेवून त्यातील समान तत्त्व शोधते. ती विशिष्ट उदाहरणे घेवून सामान्य नियमाकडे जाते. म्हणजेच **'विशिष्टा'** ⇨ **'सामान्या'** कडे प्रवास घडतो.

सॉक्रेटीसवर त्याच्या आईचा विशेष प्रभाव असावा.त्याची आई सुईणीचे काम करी. सुईण मूल निर्माण करीत नाही पण स्त्रीच्या पोटात असेलेले मूल नीटपणे सुरक्षितपणे जगात प्रवेश करावे, याचा ती प्रयत्न करते. सॉक्रेटीसच्या मते विचारांच्या क्षेत्रातील तो सुईणच आहे.'' लोकांना प्रश्न विचारून त्यांच्या मनातील विचार बाहेर काढण्याचे काम मला देवानेच दिले आहे.मी देवाने पाठविलेली गोमाशी आहे.गोमाशी जशी प्राण्यांना मुकाट्याने बसू देत नाही.सतत स्वच्छता करण्याचे काम करण्यास त्यांना भाग पाडते, तसे देवाने मला लोकांना विचार करण्यास भाग पाडण्यासाठी पाठविले आहे.म्हणून मला ते केलेच पाहिजे. ते न करणे हा देवाचा अपमान होईल, म्हणून मी ते काम आमरण करणारच '' असे तो ॲपॉलॉजीत म्हणतो. म्हणून त्याची पध्दती एका अर्थाने ' प्रसूती पध्दती '' च म्हंटली पाहिजे.

## अज्ञानाची कबुली हीच ज्ञानाची सुरुवात !

या पध्दतीतून एक गोष्ट स्पष्ट होते, ती अशी की स्वत:कडे कमीपणा घेणे याचा अर्थ इतरांना त्यांच्या अज्ञानाची जाणीव करून देणे असते. स्वत:चे अज्ञान प्रकट करणे, ही अवघड गोष्ट आहे.पण ते तत्त्वचिंतनाचे काम असते.ही पध्दती वापरूनच त्याने अनेक बेगडी व ढोंगी शहाण्यांचे शहाणपणाचे सोंग उघडकीस आणले.स्वत:ला शहाणे समजणाऱ्या अनेक प्रतिष्ठितांशी प्रदीर्घ चर्चा करुन त्याला लक्षात आले की ही माणसे शहाणी नाहीत पण आव मात्र आणतात. समाजात तसे वावरतात.त्याच वेळी त्याला स्वत:ला स्वत:च्या शहाणपणाची जाणीव झालेली होती. म्हणून त्याने '' ज्याला स्वत:च्या अज्ञानाची पूर्ण जाणीव असते तोच खरा शहाणा '' अशी व्याख्या केली. ती गृहीत धरुनच कोणत्याही संकल्पनेचे परीक्षण करताना तो स्वत:चे अज्ञान गृहीत धरतो.

सॉक्रेटीसचा स्वत:च्या अज्ञानाचा तात्त्विक आविर्भाव तर इतका उच्च दर्जाला जातो की तो म्हणतो *"I do not think, I know, what I do not know"*[7] म्हणजे "मी असा विचार करीत नाही, की 'मला जे माहित नाही ते मला माहित आहे' " याचा अर्थ असा की "मला काहीही ज्ञान नाही.आणि असलेच काही ज्ञान तर मला माझ्या अज्ञानाचे ज्ञान आहे "

सॉक्रेटीसच्या मते अज्ञान कबूल करणे हे शहाणपणाचे प्रथम लक्षण असते. जो कोणी माणूस स्वत:ला काय माहित आहे किंवा माहित नाही, याचे भान बाळगतो, तोच खरा "काहीतरी जाणणे" या ज्ञानप्रक्रियेकडे वळू शकतो.स्वत:च्या ज्ञानाची मर्यादा कबूल करणे, हाच ज्ञानाचा पाया असतो.हा अर्थात एक प्रकारचा उपहास आहे. पण लोकांना उपहास आवडत नाही, पण थेटपणे अज्ञान कबूल करणे, मान्य करणे सुध्दा लोकांना अवघड जाते. त्यामुळेच त्यांना प्रश्नोत्तर पध्दतीनेच गोंजारावे लागते ! असे सॉक्रेटीसचे म्हणणे आहे.म्हणूनच त्याने धैर्य, संयम, न्याय, दूरदर्शीपणा या सारख्या नैतिक सद्गुणांविषयीचे तत्कालिन सुशिक्षित व सुखवस्तू लोकांचे अज्ञान त्याने उघडकीस आणले, पण अतिशय नाजुक पध्दतीने.

स्वत:चे अज्ञान हाच ज्ञानाचा विषय बनविणे ही ज्ञानाची मूलभूत पायरी आहे. ते कबूल करणारा आणि म्हणूनच ज्ञानाकडे प्रवास करणारा सॉक्रेटीस हा जगातील सर्वात शहाणा माणूस आहे. (आजही ! ) सॉक्रेटीसचे हे *``I do not think, I know, what I do not know"* विधान त्याच्या तत्त्वज्ञानात्मक भूमिकेचे सार आहे.

## 2) युक्तिवादाचे स्वरुप (THE NATURE OF ARGUMENT)

पाश्चात्य तर्कशास्त्र किंवा अनुमानाचे दोन प्रकार आहेत.

**(अ) निगमन** किंवा नैगमनिक तर्कशास्त्र (Deduction or Deductive Logic).

**(ब) विगमन** किंवा वैगमनिक तर्कशास्त्र (Induction or Inductive Logic)

निगमनाचे तर्कशास्त्र म्हणजे ॲरिस्टॉटलचे तर्कशास्त्र आणि विगमनाचे तर्कशास्त्र म्हणजे बेकनचे तर्कशास्त्र होय. बेकनने ॲरिस्टॉटलच्या तर्कशास्त्रावर कठोर टीका करुन नवे तर्कशास्त्र मांडले. त्याचे तर्कशास्त्र हाच आजच्या आधुनिक विज्ञानाचा आणि वैज्ञानिक पद्धतीचा पाया बनला.

## (अ) निगमन (नैगमनिक अनुमान )

निगमनात सामान्य विधानातून विशिष्ट विधान निष्कर्ष म्हणून मिळविले जाते. नि + गमन = सामान्याकडून विशिष्टाकडे जाणे. नि = खाली आणि गमान = जाणे. वरुन खाली येणे, मोठ्यातून छोटे वजा करणे. सामान्यातून विशिष्ट किंवा कमी सामान्य वजा करणे म्हणजे निगमन करणे होय. उदाहरणार्थ ,

A) सर्व माणसे मर्त्य आहेत
सॉक्रेटीस माणूस आहे. } आधार विधाने
म्हणून सॉक्रेटीस मर्त्य आहे. ⟶ निष्कर्ष विधान

B) राणी एकतर ग्रंथालयात अभ्यास करीत आहे किंवा मैत्रिणीबरोबर सिनेमाला गेली आहे
पण ती आता ग्रंथालयात कोठेच दिसत नाही. } आधार विधान
याचा अर्थ : ती मैत्रिणीबरोबर सिनेमाला गेली आहे. ⟶ निष्कर्ष विधान

[7] एका प्रसिध्द राजकारणी माणसाकडे सॉक्रेटीस गेला.त्यांची प्रश्नोत्तरे झाली त्यावेळी सॉक्रेटीसने जो विचार केला तो असा " या माणसापेक्षा मी शहाणा आहे.कदाचित असे असेल की जाणण्यासारखे काही दोघेही जाणत नसूच, पण त्याला वाटते की त्याला काहीतरी माहित आहे पण वास्तवात त्याला माहित नाही. मला हे ही माहित नाही की मला माहित आहे की नाही. या संदर्भात या मर्यादेपर्यंतच त्याच्यापेक्षा मी शहाणा आहे. मी शहाणा आहे. मी असा विचार करीत नाही की, मला जे माहित नाही ते मला माहित आहे " ॲपॉलॉजी 21e

निगमानाचे वैशिष्ट्य म्हणजे यातील आधारविधाने सत्य व युक्त असतील तर निष्कर्ष विधानही सत्य व युक्तच असते. किंवा आधारविधानात जे सांगितले आहे तेच निष्कर्ष विधानात सांगितले असते. निष्कर्ष अनिवार्यरित्या सत्यच असतो. तो संभाव्य नसतो. आधार विधान सत्य व युक्त मानली तर निष्कर्ष विधानही सत्य व युक्तच मानला जातो.

अनुमानाच्या या प्रकारात युक्तिवादाला एक आकार मिळतो. तो असा ङ

सर्व माणसे मर्त्य आहेत
सॉक्रेटीस माणूस आहे. आधार विधाने
म्हणून सॉक्रेटीस मर्त्य आहे. ⟶ निष्कर्ष विधान



कोणत्याही विधानात उद्देश (Subject) आणि विधेय (Predicate) ही दोन पदे असतात. उद्देश (Subject) म्हणजे कोणतीह वस्तू अथवा व्यक्ति. विधेय (Predicate) म्हणजे उद्देशाविषयी माहिती देणे.

'सर्व माणसे मर्त्य आहेत' या विधानात 'सर्व माणसे' हे पद विधानात उद्देशपदी येते आणि 'मर्त्य' हे पद 'विधेय' पदी येते. 'सॉक्रेटीस माणूस आहे' या विधानात 'सॉक्रेटीस' हे पद विधानात उद्देशपदी येते आणि 'माणूस हे पद 'विधेय' पदी येते. म्हणून वरील दोन विधानांचा आकार असा बनतो :

सर्व उद्देश विधेय आहेत - सर्व उ. वि. आहेत.
उद्देश विधेय आहे. - उ. वि. आहे.

" उ. वि." असणे हा आकार आहे. यात 'उ.' च्या जागी आणि 'वि.'च्या जागी काहीही लिहिले तरी आकार कायम तोच राहतो. पण जे काही लिहिले असेल तर स्वीकारले गेले तर तेच निष्कर्ष विधानातही येतेच. या अर्थाने निष्कर्ष विधान आधार विधानाच्या बाहेर जात नाही. आकार कायम राहातो. म्हणून या अनुमानास 'आकारिक अनुमान' असेही नाव आहे. आधार विधानांनी दिलेलया पुराव्याच्या चौकटी राहूनच निष्कर्ष काढावा लागतो. अशा केवळ आकारावर अवलंबून असलेलया युक्तिवादात असत्य विधाने आधार म्हणून येवू शकतात. आणि मग ती निष्कर्ष विधान म्हणून स्वीकारली जातात.

सर्व म्हशी बुद्धिमान असतात.
सगुणा म्हैस आहे.
म्हणून सगुणा बुद्धिमान आहे.

सर्व वकिल चतुर व लबाड असतात.
राजू वकिल आहे.
म्हणून राजू चतुर व लबाड आहे.

## (अ ) विमगन किंवा वैगमनिक अनुमान :

अनुमानाच्या या प्रकारात एखाद्या विशेष विधानावरुन साम्याच्या आधारे दुसरे एखादे विशेष विधान निष्पन्न केले जाते किंवा एकसारख्या अनेक विशेष विधानांवरुन सामान्य स्वरुपाचा निष्कर्ष काढला जातो. हे निष्कर्ष निश्चित नसतात, तर बहुधा संभाव्य असतात.उदाहरणार्थ एकदा एखाद्या डॉक्टरने दिलेले औषध लागू पडले, हे अनुभवल्यानंतर आपण पुढच्या वेळी त्याच डॉक्टरकडे जातो.त्यावेळी पूर्वीप्रमाणेच आताही औषध लागू पडण्याची दाट शक्यता आहे, असे संभवात्मक अनुमान असते.तसेच जिथे जिथे धूर दिसतो तिथे तिथे अग्नी आढळतो. त्यावरुन धूर तेथे अग्नी असा सामान्य निष्कर्ष आपण काढतो. जसे :

अ माणूस मर्त्य आहे.
ब माणूस मर्त्य आहे.
क माणूस मर्त्य आहे.
ड माणूस मर्त्य आहे. } आधार विधाने
प माणूस मर्त्य आहे.
फ माणूस मर्त्य आहे.
ब माणूस मर्त्य आहे.
म्हणून सर्व माणूसे मर्त्य आहेत. → निष्कर्ष विधान

थोडक्यात विशिष्ट उदाहरणावरून सामान्य निष्कर्ष काढणे अथवा विशिष्ट विधानावरुन सामान्य विधानाकडे जाणे म्हणजे विगमन होय. असा विगमानत्मक तर्क तो वैगमनिक तर्क होय.वि + गमन = विशिष्टाकडून पुढे (सामान्याकडे) जाणे.

दुसरे असे की हे दोन्ही प्रकार एकमेकांवर अवलंबून आहेत. वैगमनिक अनुमानाचा निष्कर्ष हा नैगमनिक अनुमानाचा आधार बनतो. नैगमनिकचा अनुमानाचा निष्कर्ष हाच वैगमनिकचा अनुमानाचा आधार असतो.

## तर्काभास / विचारदोषच (Fallacy)

आता माणूस नेहमीच तार्किक विचार करेल,असे नाही.कधी कधी तो चुकीचा,अयोग्य विचार करतो.(खरे तर सामान्यजन बरेचदा अतार्किक, भावनाप्रधान विचार करतात.) असा विचार किंवा युक्तिवाद ऐकताना तर्कयोग्य वाटतो पण मुळात तसा तो नसतो. अशा विचारास ' तर्काभास, विचारदोष,तर्कदोष अथवा हेत्वाभास' (Fallacy)असे म्हणतात .असे शेकडो तर्कदोष असून त्यांचाही अभ्यास तर्कशास्त्रात होतो.तर्कदोष आपण टाळावयाचे असतात आणि इतरांना करु द्यावयाचे नसतात .

************************************